**नि. फौ. ख. क्रं.२००००१७ /२०१३**
**शासन वि. हरीचंद्र**
**निशाणी क्र. १८९**

| | |
|---|---|
| नि.फौ.ख.दाखल दिनांक | ०६/०३/२०१३ |
| नि.फौ.ख.नोंद दिनांक | ०६/०३/२०१३ |
| नि.फौ.ख.निकाल दिनांक | २४/०७/२०२६ |
| कालावधी | **१३ वर्षे ०४ महिने १८ दिवस** |

| | |
|---|---|
| MHYA130001052013 | **दिग्रस येथील न्यायदंडाधिकारी वर्ग-१, न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी - बा. ना. गोडबोले)**<br>**-: न्यायनिर्णय :-**<br>( घोषित दिनांक २४.०७.२०२६ )<br>**नियमित फौजदारी खटला क्र.२००००१७/२०१३, निशाणी क्र.१८९/ब**<br>**२/२०१२ पोलीस ठाणे दिग्रस** |
| फिर्यादी | राजेश गणेश खोडे |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती एम. बी. निब्रड |
| आरोपीं | **१. हरीचंद्र मुरली सोनवाल (मयत)**<br>**२. राहूल भिकू सोनवाल,**<br>वय- ३२ वर्षे, धंदा - मजुरी<br>**३. बंटी उर्फ धिरज भिकुलाल सोनवाल,**<br>वय- ३५ वर्षे, धंदा - मजुरी/सफाई कामगार,<br>**४. भोला भिकूदास सोनवाल,**<br>वय- ३५ वर्षे, धंदा - शेती,<br>**५. शक्ती अमर सोनवाल,**<br>वय- ३५ वर्षे, धंदा - शेती, |

| | |
|---|---|
| | **६. संजय किसन सोनवाल,**<br>वय- ५८ वर्षे, धंदा - वकिल,<br>**७. गंजु किसन सोनवाल**<br>वय- -- वर्षे, धंदा ----,<br>सर्व आरोपी रा. भंगीपुरा आंबेडकर चौक, दिग्रस.<br>ता. दिग्रस, जि. यवतमाळ |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. व्ही. जी. मुंगळे |

**भाग -ब**

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | ०१/०१/२०१२ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०६/०३/२०१३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २५/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २४/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | हरीचंद्र मुरली सोनवाल (मयत) | ७/११/२०१२ | ०३/०३/२०२३ | कलम १४७, | | | |

**नि. फौ. ख. क्रं.२०००१७ /२०१३**
**शासन वि. हरीचंद्र**
**निशाणी क्र. १८९**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२. | राहुल भिकु सोनवाल | | | १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ भा.द.वि. व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ०३. | बंटी उर्फ धिरज भिकुलाल सोनवाल | | | | | | |
| ०४. | भोला भिकुदास सोनवाल | | | | | | |
| ०५. | शक्ती अमर सोनवाल | | | | | | |
| ०६. | संजय किसन सोनवाल | | | | | | |
| ०७. | गंजु किसन सोनवाल | | | | | | |

**भाग -क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप ( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | राजेश गणेश खोडे | वर्दीदार /साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | कुंदन गणेश खोडे | साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप ( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**नि. फौ. ख. क्रं.२०००0१७ /२०१३**
**शासन वि. हरीचंद्र**
**निशाणी क्र. १८९**

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सी. सा. क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी अ. अभियोग**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | नि.क्र.- १७५/ सा. क्र.१ | वर्दीदार/साक्षीदार क्र. १ |
| २ | नि.क्र.- १७६ | वर्दी वरील सही |
| ३ | नि.क्र.- १७७ | छापील एफ. आय. आर. वरील सही |
| ४ | नि.क्र.- १७८/ सा. क्र.२ | साक्षीदार |
| ५ | नि.क्र.- १८२ ते १८४ | तीन वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ५ | नि.क्र.- १८५ व १८६ | जप्ती/घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| **अनु. क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | ३/२०१३ | एक बाश्याची काठी, एक वेळूची काठी |

**नि. फौ. ख. क्रं.२००००१७ /२०१३**
**शासन वि. हरीचंद्र**
**निशाणी क्र. १८९**

## <u>न्यायनिर्णय</u>

( घोषित दिनांक २४ /०७/ २०२६)

१) आरोपींविरुध्द भारतीय दंडसंहिता कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२) प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, वर्दीदार हे रा. आंबेडकर चौक, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथील रहिवाशी आहेत. दि. ०१/०१/२०१२ रोजी अंदाजे सायंकाळी ०६.०० ते ६.३० वाजण्याच्या दरम्यान वर्दीदार त्यांच्या घरासमोर पायरीवर बसुन असतांना वर्दीदार यांना तु डुक्कर मारले' असा रिपोर्ट पोलिस स्टेशनला का दिला या कारणावरुन सर्व आरोपींनी वर्दीदार यांना शिवीगाळ केली व लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन, आरोपी हरीचंद्र सोनवाल याने त्याच्या जवळील तलवारीने वर्दीदार यांच्या पाठीवर मारले. त्यामुळे वर्दीदार यांना पाठीवर मार लागला. त्यावेळी त्यांचे आई वडील भांडण सोडवायला आले असता, वर्दीदार यांच्या आईच्या डोळयावर आरोपी राहुल सोनवाल यांने लाकडाने मारुन जखमी केले. तसेच वर्दीदार यांच्या वडीलांना आरोपी बन्टी सोनवाल व भोला सोनवाल यांनी काठीने मारले व वर्दीदार यांचा लहान भाऊ कुंदन हा सोडविण्यास

आला असता त्याला भोला सोनवाल, बन्टी सोनवाल, शक्ती सोनवाल यांनी काठी व गजाने मारल्याने कुंदन याचे पोटावर व दोन्ही पायाच्या घुटण्यावर मुक्का मार लागला. तसेच संजय किसन सोनवाल व गंजु किसन सोनवाल हे दोघेही यांचे तंगडे तोडुन टाका आम्ही पाहुन घेतो असे प्रोत्साहन देत होते. तसेच सर्व आरोपींनी वर्दीदार व त्यांच्या आई, वडील व भाऊ यांना शिवीगाळ करुन लाथ्था बुक्क्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वर्दीदार हिने आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, दिग्रस येथे वर्दी दिली.

३) वर्दीवरुन पोलीस ठाणे दिग्रस यांनी आरोपींविरुध्द अपराध क्रं. २/२०१२ अन्वये भा.द.वि. १८६० कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता गुन्हा नोंदविला. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास तपासी अंमलदार एस. एफ राऊत पो. उपनिरीक्षक, दिग्रस पोलीस स्टेशन यांना सोपविण्यात आला. त्यांनी वर्दीदार व साक्षीदारांची विचारपुस करुन त्यांचा जबाब नोंदविला. त्याचप्रमाणे पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपींविरुध्द वरील नमुद अपराधाकरिता दोषारोप पत्र दाखल केले.

४) आरोपीं विरुध्द नि.क्र. १४३ वर भारतीय दंडसंहिता कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता त्यांनी तो अमान्य असल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपींविरुध्द कोणताही दोषात्मक पुरावा व परिस्थिती आढळुन आली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन सोडुन देण्यात आले.

५) प्रकरणातील मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि. ०१/०१/२०१२ रोजी अंदाजे सायंकाळी ६.०० ते ०६.३० वाजण्याच्या सुमारास मौजे–आंबेडकर चौक, दिग्रस, ता. दिग्रस, जि. यवतमाळ गावाच्या हद्दीत सर्व आरोपींनी समान उद्दिष्ट साधन्यासाठी आगळीक करण्याचे उद्दीष्ट असलेल्या बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही |

| अ. क्रं | <u>मुददे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| २ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी समान उद्दिष्ट साधण्यासाठी बेकायदेशिर जमाव करून तलवार, गज व लाकूड या सारख्या प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होउन दंगा केला हे सिध्द केले काय ? | <u>नाही</u> |
| ३ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्दिष्ट साधन्यासाठी वर्दीदार, त्यांचे आई–वडील व भाऊ यांना काठीने मारुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व भारतीय दंड सहिता कलम ३२४ अन्वये गुन्हा केला? | <u>नाही</u> |
| ४ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख,वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्दिष्ट साधन्यासाठी वर्दीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उददेशपुर्वक अपमान केला, ज्यामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा यासाठी त्यांना प्रक्षोभित केले ? | <u>नाही</u> |
| ५ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्दिष्ट साधन्यासाठी वर्दीदार, त्यांचे आई–वडिल व भाऊ यांना धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली ? | <u>नाही</u> |

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ६ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्दिष्ट साधन्यासाठी विना परवाना तलवार बाळगली व त्याद्वारे तुम्ही भारीतय हत्यार कायदा कलम ४/२५ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराशध केला आहे ? | नाही |
| ७ | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

६) अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेला दोष सिध्द करण्यासाठी केवळ दोन साक्षीदार तपासले आहे. ते म्हणजे वर्दीदार राजेश गणेश खोडे (सा.क्र.१) व साक्षीदार कुंदन गणेश खोडे (सा.क्र.२) हे आहेत.

**मुददे क्रं. १ ते ६ बाबत...**

७) सदर मुददे एकमेकांची निगडित असल्यामुळे सोयीकरिता एकत्रीत चर्चे करिता घेतले आहेत. वर्दीदार/साक्षीदार राजेश गणेश खोडे (सा.क्र.१) व साक्षीदार कुंदण गणेश खोडे (सा.क्र.२) यांचा पुरावा निशानी क्रं. १७५ व १७८ चे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या पुराव्यात त्यांचे वडिल गणेश खोडे मयत झाल्याचे

सांगीतले. वर्दीदार/साक्षीदार राजेश गणेश खोडे (सा.क्र.१) व साक्षीदार कुंदण गणेश खोडे (सा.क्र.२) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने सर्व साक्षीदारास उलट तपासात विचारले जावु शकणारे प्रश्न विचारण्यात आले. मात्र अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काहीही त्यांनी सांगितले नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही. थोडक्यात वर्दीदार (सा.क्र.१) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्ष प्रथम माहिती अहवाल शाबीत करु शकला नाही. याउलट अभियोग पक्षाने निशाणी १८० वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली. तसेच अभियोग पक्षातर्फे निशाणी क्र. १८१ वर पुरसीस दाखल करुन त्यांचे व आरोपीचे आपसी झाल्याचे नमुद केले आहे.

८) न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपींतर्फे जप्ती/घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. १८५ व १८६, तीन वैदयकीय प्रमाणपत्र निशाणी क्र. १८२ ते १८४ मान्य केल्याचे दिसून येते. त्यामुळे वर्दीदार यांचे वैदयकीय अहवाल निशाणी क्र. १८२ ते १८४ मध्ये नमुद असलेली दुखापत झाली असल्याचे स्पष्ट होते. मात्र, वर्दीदार यांना सदर दुखापत आरोपींनीच केली याबाबत काहीही पुराव्यात आले नाही. त्यामुळे वैदयकीय अहवाल निशाणी क्र. १८२ ते १८४ मधील दुखापत आरोपीनींच त्यांना केली असे म्हणता येणार नाही.

९) वरील बाबी, परिस्थीती व न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता सदरील प्रकरणात आरोपीं क्र. १ ते ७ विरुध्द न्यायालयीन अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा आढळुन आला नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्ष आरोपींविरुध्द सदर गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुद्दे क्रं. १ ते ६ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुददा क्रं. ७ बाबत...</u>**

१०) मुद्दे क्रं. १ ते ६ च्या निष्कर्षप्राप्तीनुसार भारतीय दंड संहिता कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपींविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर अपराधामधुन सदर आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## // आ दे श //

१. आरोपी क्र. १ ते ७ यांची भारतीय दंड संहिता कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम २४८(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपींचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. जप्त मुद्देमाल एक बाश्याची काठी, एक वेळूची काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम ४३७(अ), अन्वये आरोपींनी प्रत्येकी रु. १५,०००/– चे बेल बॉन्ड जमा करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.07.24 17:22:25 +0530

ठिकाणः दिग्रस

दि. २४/०७/२०२६

**( बा. ना. गोडबोले )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दिग्रस.

# CERTIFICATE

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment. | |
| Name of Stenographer | Ku. N. S. Jadhao (Stenographer G-3) |
| Court | CJJD & JMFC, Digras |
| Date | **24/07/2026** |
| Judgment signed by the Presiding Officer on | **24/07/2026** |
| Judgment uploaded on | **24/07/2026** |